**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**
**अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१८-१९)**
**एकदिवसीय कार्यशाळेचा अहवाल**

| | |
|---|---|
| **शीर्षक** | **MOODLE based-Teaching and E-Content Development** या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा |

| **समिती** | **अध्यक्षा** | **तज्ज्ञ मार्गदर्शक** |
|---|---|---|
| अग्रणी महाविद्यालय | मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे | मा. डॉ. उत्तम जाधव |

**वार व दिनांकः** बुधवार, दि. ०९ जानेवारी २०१९, **वेळः** सकाळी ९ ते दुपारी ४
**स्थळः** सेमिनार हॉल

**सहभागः** महाविद्यालयांचे प्राध्यापक प्रतिनिधीः ५०, तज्ज्ञ मार्गदर्शकः ०१, समिती सदस्यः ०५, शिक्षकेतर कर्मचारी, शिपाई आणि विद्यार्थी स्वयंसेवकः ०८; एकूणः **६४**

**उद्देशः** १. ई कंटेट ही संकल्पना स्पष्ट करणे; २. ई कंटेट प्रभावीपणे कसे राबवता येईल ते समजाऊन सांगणे; ३. मूडल तयार करुन, त्यांची अंमलबजावणी करणे.

**संक्षिप्त अहवाल**

विद्यार्थ्यांबरोबरच, उच्च शिक्षणासंदर्भातील सर्व घटकांमध्ये वैचारिक आदानप्रदान व्हावे हा सुध्दा अग्रणी महाविद्यालय या संकल्पनेचा उद्देश आहे. त्यान्वये, सदर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सर्वप्रथम, संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन, तसेच दीपप्रज्वलन करुन मान्यवरांनी कार्यक्रमाचे **उद्घाटन** केले. त्यानंतर, कार्यक्रम समन्वयक डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी **कार्यशाळेची संकल्पना आणि उद्देश स्पष्ट** केले. तसेच, तज्ज्ञ **मार्गदर्शकांची ओळख** उपस्थितांना करुन दिली. पुढे प्राचार्यांच्या हस्ते ग्रंथभेट देऊन, त्यांचा **सत्कार** करण्यात आला.

कार्यशाळेच्या **पहिल्या सत्रामध्ये** तज्ज्ञ मार्गदर्शक मा. डॉ. उत्तम जाधव यांनी प्रारंभ केला. **ई कंटेट ची संकल्पना, तिचे स्वरुप** हा त्यांच्या प्रथम सत्राचा विषय होता. यामध्ये, त्यांनी, विविध उदाहरणांद्वारे ही संकल्पना समजाऊन सांगीतली. त्यांची व्याप्ती स्पष्ट केली. पुढे, दुसऱ्या सत्रातमध्ये, त्यांनी **ई-कंटेट प्रभावीपणे कसे राबवता येईल** हे प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट केले. यासाठी, सदर आणि पुढील सत्र महाविद्यालयाच्या संगणक कक्षामध्ये आयोजित करण्यात आले. यामध्ये, त्यांनी, स्वउदाहरणाद्वारे ई–कंटेट कसा तयार करता येतो, गूगल ड्राईव्हचा वापर करुन, शेअरिंग आणि एडिटिंग कसे करता येते हे समजाऊन सांगीतले. शेवटचे, म्हणजे, तिसरे सत्र प्रात्यक्षिकावर आधारलेले होते. याठिकाणी **मूडल तयार करण्यास** मार्गदर्शन केले गेले. यावेळी, उपस्थित प्राध्यापकांनी मूडल तयार करुन, त्याचा वापर अध्यापनासाठी कसा केला जातो हे, प्रात्यक्षिक करुन, समजाऊन घेतले.

अशा प्रकारे, या तिन्ही सत्रातील मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिकांनंतर, तज्ज्ञांनी **उपस्थित प्राध्यापकांशी चर्चा** केली. यावेळी प्राध्यापकांनी विविध प्रश्न विचारले. त्यांचे यथायोग्य समाधान तज्ज्ञांनी केले. त्यानंतर, काही प्राध्यापकांनी एकंदर कार्यशाळेबाबत आपले **मनोगत व्यक्त** केले.

शेवटी **अध्यक्षीय समारोपामध्ये** मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे यांनी, सर्व व्याख्यानांवर आपले अभ्यासपूर्ण मनोगत सादर केले. अशा प्रकारच्या कार्यशाळेंचे महत्व अधोरेखित केले. शेवटी डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी **आभार** मानून कार्यक्रमाची सांगता केली.

त्यानंतर, **भोजनाचा** कार्यक्रम होऊन, **प्रमाणपत्राचे वाटप** झाले. यानंतर कार्यशाळेचा समारोप झाला.

या कार्यशाळेची तांत्रिक बाजू प्रा. निलेश कांबळे यांनी सांभाळली. तर प्रशासकीय बाजू श्री. संदिप इथापे यांनी सांभाळली. एकंदर व्यवस्थापकीय सहकार्य श्री. सुकुमार पुजारी, श्री. सचिन कांबळे, श्री. तानाजी धनगर या शिपाई वर्गाने आणि श्री. दत्तात्रय कोळी, कु. प्रियांका कोठावळे इ. या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी दिले. भोजनव्यवस्थेचे सहकार्य श्री. आवळे (कोरोची) यांनी केले.



**उद्देशांची परीपूर्तीः** १. ई कंटेट ही संकल्पना, तिचे स्वरुप स्पष्ट झाले; २. ई कंटेटचा प्रभावी वापर स्पष्ट झाला; ३. मूडल कसे तयार करायचे ते समजले, त्याचा अध्यापनासाठी कसा वापर करायचा ते लक्षात आले.

## कार्यशाळेची क्षणचित्रे







१. उद्घाटन समारंभ २. प्रास्ताविक: डॉ. निरंजन कुलकर्णी (समन्वयक) ३. पाहुण्यांचे स्वागत

४ ते ६. तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. उत्तम जाधव (सत्र पहिले: ई कंटेट-संकल्पना, सत्र दुसरे: ई कंटेटचा वापर, सत्र तिसरे: उपस्थितांकडून प्रात्यक्षिक)





७ ते ९. कार्यशाळेतील सहभागी प्राध्यापकांचे मनोगत



१०. अध्यक्षीय समारोपावेळी मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे

**।। दुरितांचे तिमिर जावो।।**

**मा. श्री. अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले**

**शिवाजी विद्यापीठांतर्गत अग्रणी महाविद्यालय कार्यक्रम (२०१८-१९)**

**एकदिवसीय कार्यशाळा**

# MOODLE based-Teaching and E-Content Development

**अध्यक्षाः मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे**

**तज्ज्ञ मार्गदर्शकः मा. डॉ. उत्तम जाधव**

(डीन, स्कूल ऑफ लिबरल आर्टस्; विभागप्रमुख, इंग्रजी विभाग,
संजय घोडावत विद्यापीठ, अतिग्रे)

## कार्यक्रमपत्रिका

**दिनांकः ९ जानेवारी २०१९** **वेळः सकाळी ९.०० ते दुपारी ४.३०** **स्थळः सेमिनार हॉल**

| वेळ | कार्यक्रम | तपशील |
|---|---|---|
| **९ ते ९.३०** | **नोंदणी** | |
| **९.३० ते १०** | **उद्‌घाटन समारंभ** | |
| | **स्वागत आणि प्रास्ताविक** | डॉ. निरंजन कुलकर्णी |
| | **माननीय पाहुण्यांची ओळख आणि त्यांचा सत्कार** | |
| **१० ते ११.३०** | **पहिले सत्र-**Concept and Nature of E-Content | मा. डॉ. उत्तम जाधव |
| **११.३० ते १** | **दुसरे सत्र-** Effective Use and Creation of E-Content (OER) | मा. डॉ. उत्तम जाधव |
| **१ ते १.४५** | **भोजन** | |
| **१.४५ ते ३.१५** | **तिसरे सत्र-**Creation and Application of MOODLE (LMS) | मा. डॉ. उत्तम जाधव |
| **३.१५ ते ४** | **प्रश्नोत्तरे आणि चर्चा** | सहभागी प्राध्यापक |
| **४ ते ४.३०** | **समारोप समारंभ** | |
| | **मनोगत** | उपस्थित सहभागी प्राध्यापक |
| | **अध्यक्षीय मनोगत** | मा. प्राचार्या डॉ. योजना जुगळे |
| | **आभार** | डॉ. निरंजन कुलकर्णी |
| | **प्रमाणपत्र वितरण** | |